जा.क्र./2018/रोहयो/कक्ष-8/तां.शा./कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
दिनांक 27/11/2018

## जाहीर प्रगटन

शासनाने "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" संपुर्ण राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदरील योजने अंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील सर्व तालुक्यातील गावांमध्ये योजनेतील भाग-ब- शेत/पाणंद रस्ता अतिक्रमण मुक्त करून कच्चा रस्ता तयार करणे साठी दोन्ही बाजूने चर खोदून त्यामधून निघणारी माती/मुरूम शेत/पाणंद रस्त्यामधील भागात टाकणे. तसेच चरात खोदून निघालेली माती/मुरूम योग्य प्रमाणात पसरवून रस्त्यांचा कच्चा भराव तयार करणे साठी अर्थमुव्हर उत्खनन यंत्राची (जे.सी.बी, पोकलेन) ची आवश्यकता आहे. तसेच उपलब्ध मुरूम व दगड दबाई करीता रोडरोलरची आवश्यकता आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार या कामासाठी औरंगाबाद जिल्हया अंतर्गत यंत्रधारकांचे पॅनल तयार करण्याचे जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने निश्चित केलेले आहे. पॅनलवरील यंत्रधारकांची/तालुकास्तरीय समितीच्या मागणीप्रमाणे शिफारस करण्यात येणार आहे. उपरोक्त उत्खनन यंत्रासाठीचे व रोडरोलरचे तालुकानिहाय दर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना"जिल्हास्तर कार्यकारी समिती ने निश्चीत केलेले असून त्याचा तपशिल जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळ www.aurangabad.nic.in तसेच रोजगार हमी योजना शाखेत उपलब्ध आहे.

जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने निश्चित केलेल्या दरांनुसार जिल्हयातील ज्या यंत्रधारकांना उपरोक्त योजनेअंतर्गत काम करण्याची इच्छा आहे. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो) शाखा E-mail id-egsdycoll.aur-mh@gov.in वर अथवा रोहयो शाखेमध्ये प्रत्यक्षात आपल्याकडे उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीच्या तपशिलासह अर्ज दाखल करण्याबाबत दि. 26/11/2018 पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती. सदरील जाहीर प्रगटनास मुदतवाढ देण्यात आलेली असून आपले अर्ज दि.10/12/2018 पर्यंत शासकीय कामकाजाच्या कार्यालयीन वेळेत (सायंकाळी 17:45) दाखल करावेत. असे आवाहन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना" जिल्हास्तर कार्यकारी समिती औरंगाबाद यांनी केले आहे. दिनांक 11/12/2018 नंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

दिनांकः-27/11/2018
ठिकाणः-औरंगाबाद

जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष "पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना"
कार्यकारी समिती औरंगाबाद करीता

Signature valid

Digitally signed by SHIVAJI SHINDE
Date: 2018.11.27 1?:50:42 IST
Reason: Approved

**परिशिष्ट - ब**

**(१) पालकमंत्री शेत/पाणंद रस्तेसाठी लागणा-या यंत्रसामुग्री करीता जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने मान्यता दिलेले तालुका निहाय दर (यंत्र व इंधनासह)**

| अ.क्र | यंत्राचे नाव | यंत्र सामुग्रीचे दर प्रतीतास (रुपये) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | औरंगाबाद | फुलंब्री | सिल्लोड | सोयगाव | कन्नड | खुलताबाद | वैजापुर | गंगापुर | पैठण |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) | 725 | 725 | 725 | 750 | 750 | 750 | 750 | 750 | 750 |
| 2 | चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) | 2100 | 2100 | 2100 | 2200 | 2200 | 2200 | 2200 | 2200 | 2200 |
| 3 | रोड रोलर डी.आर.आर 8-10 टन | 300 | 300 | 300 | 400 | 400 | 350 | 400 | 400 | 400 |

टिपः- रोडरोलर प्रति किलोमीटर कमाल खर्च मर्यादा रु. 15000 /- किमी.

**(२) सी.एस. आर. /एन.जी.ओ यांच्या माध्यमातुन पालकमंत्री शेत/ पाणंद रस्ते साठी लागणारी यंत्र सामुग्री विनामोबदला उपलब्ध होत असल्यास, इंधनाकरीता जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने मान्यता दिलेले दर**

| | यंत्राचे नाव | इंधनाचे दर (रुपये) |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | टायर असलेले बॅकहो लोडर व एक्सकॅव्हेटर (७० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले जेसीबी इत्यादी अर्थमुव्हर) | 397 प्रतीतास |
| 2 | चेन असलेले एक्सकॅव्हेटर (२०० HP पेक्षा अधिक क्षमता असलेले पोकलेन इत्यादी अर्थमुव्हर) | 816 प्रतीतास |
| 3 | रोड रोलर डी.आर.आर (8-10 टन) | 229 प्रतीतास |
| 4 | टिप्पर (7.5 टन) | 17.50 प्रती कि.मी |
| 5 | पाण्याचे टॅंकर ( 7000 ते 9000 लीटर) | 500 प्रती खेप |

जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष "पालक मंत्री शेत/ पाणंद रस्ते योजना"
कार्यकारी समिती औरंगाबाद जिल्हा

Scanned by CamScanner